MHLA050003692021

लवाद दरखास्त क्रं. ११३३/२०२१

आनंद वि. सक्षम अधिकारी व इतर

**आदेश नि.क्रं. ७ वर**

ऋणको क्र.२ यांनी हा अर्ज दाखल करुन या प्रकरणी त्यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा प्रकरण चालवण्याचा आदेश रद्द करण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर धनकोतर्फे म्हणणे दिलेले नाही.

३. ऋणको क्र.२ च्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. ऋणको क्र.२ च्या वकिलांचे म्हणणे असे की, प्रस्तुत ऋणको यांनी भुसंपादन अर्जाच्या अॅवार्डला वरिष्ठ न्यायालयात आव्हान दिलेले आहे. त्यामुळे याकामी हजर होवून म्हणणे दाखल करण्यास उशिर झाला.

४. सदरचे प्रकरण नुकसान भरपाई रक्कम वसुलीसाठी दाखल केले आहे. त्यामधील धनकोचे कायदेशीर हक्क ठरवण्यासाठी ऋणको क्र.२ विरुध्द झालेला एकतर्फा प्रकरण चालवण्याचा आदेश रद्द करुन म्हणणे दाखल करुन घेतल्यास वादाचा पुर्णपणे निपटारा होण्यास मदत होणार आहे. यामध्ये धनकोचे कांहीही नुकसान होणार नाही. म्हणून सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

ऋणको क्रं.२ यांच्या विरुध्द एकतर्फा प्रकरण चालवण्याचा झालेला आदेश रद्द केला आहे.

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2022.04.11 16:10:53 +0530

**(प्र. अ. सवदीकर)**

दिनांक ११/०४/२०२२.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

अहमदपूर.